संं.फौ.ख.क्र. ६३७/२०१९
सरकार-वि- हरीदास
निशाणी क्र. १० लगत

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - तुषार वसंतराव बागडे
**वय** - ३६ वर्ष, **व्यवसाय** - शेती
**पत्ता** - बडेगाव, तह. सावनेर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. टी. एस. आरगे यांच्यामार्फत.**

दि. २७.०१.२०१९ रोजी पोलिस माझ्याकडे आले होते. मला समंस दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१६** देण्यात येते. माझी सही बस स्टॉपवर घेतली. मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीला **निशाणी क्र.१७** देण्यात येते.

**(साक्षीदार हा अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.)**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, दि. २७.०१.२०१९ रोजी पोलिस फिर्यादीसह माझ्याकडे आले व दि. २६.०१.२०१९ रोजी झालेल्या घटनेबद्दल मला माहिती दिली. त्यानंतर मी सुचना पत्रावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मी, सरपंच व पोलिस ग्रामसभा झाली तिथे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने माझ्या समक्ष घटनास्थळ दाखवले. हे म्हणणे खरे आहे की, इमारती विटा सिमेंटनी बांधलेले व उत्तरेकडे तोंड असलेली इमारत आहे व त्याला लोखंडी गेट आहे. हे म्हणणे खरे आहे की, २०० फुट रूंदीचा हॉल होता, तिथे टेबल खुर्च्या व संगणक कागदपत्र होती, तसेच लोखंडी आलमारी व प्लॉयवूडचे पारटिशन होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा व कच्चा हात नकाशा तयार केला व माझी सही घेतली. मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १८** देण्यात येते.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पि. एन. काळे यांचेमार्फत**

**आरोपी हजर. आरोपींतर्फे वकील गैरहजर. आरोपींनी अर्ज दिला त्यावरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

सावनेर, (एस. एम. गाडे)
दिनांक २१.०५.२०२५ **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

संं.फौ.ख.क्र. ६३७/२०१९
सरकार-वि- हरीदास
निशाणी क्र. १० लगत

**साक्षीदार क्र. २ तुषार वसंतराव बागडे यांचा उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पि. एन. काळे यांचेमार्फत**

**३.** समंस व घटनास्थळ पंचनाम्यावर कोणत्या ठिकाणी सही केली हे मला आठवत नाही. पंचनाम्यात काय लिहिले आहेत हे मला माहित नाही. पोलिसांनी मला पंचनाम्याकरिता बोलावले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अभियोग पक्षातर्फे विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांची उत्तरे खोटी आहेत.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.06.23 17:42:06 +0530

सावनेर,
दिनांक २३.०६.२०२५

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe